श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कर्जुने खारे ता.जि.अहिल्यानगर यांचे गैरवर्तनाबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/५०६/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ - १.या कार्यालयाचे सेवानिलंबन आदेश क्र.ग्रापं-३/२४२७००८/२०२६,दि.०८/०६/२०२६
२.या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२४२७०११/२०२६,दि.०८/०६/२०२६.
३.गटविकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/८७२/२६, दि.११/०८/२०२६.
४.या कार्यालयाचे ज्ञापन क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३७४/२०२६,दिनांक ३०/०९/२०२६.
५. या कार्यालयाचे पुन:स्थापीत आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/४४८/२०२६, दि.३०/०९/२०२६.
६. श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,तत्का.ग्रामपंचायत अधिकारी कर्जुनेखारे,ता.अहिल्यानगर यांचा खुलासा दिनांक १३/१०/२०२६.
७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम (६)(३)
८.सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.विचौ-१/प्र.क्र.४५/१३२५-वशिअ,मुंबई दिनांक २५ एप्रिल २०२५

ज्याअर्थी,संदर्भ क्र.१ नुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर यांनी कार्यवाही करुन दिनांक २०/०४/२०२६ रोजी गुन्हा दाखल केल्यामुळे श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कर्जुने खारे ता.जि.अहिल्यानगर यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करण्यात आले आहे. श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कर्जुने खारे ता.जि.अहिल्यानगर येथे कार्यरत असताना गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.४ अन्वये एकुण ०७ दोषारोप ठेवण्यात आले होते. संदर्भ क्र.६ नुसार श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कर्जुने खारे ता.जि.अहिल्यानगर यांनी खुलासा सादर केला असुन श्रीम डेरे यांनी त्यांचेवर ठेवण्यात आलेले सर्व आरोप अमान्य केलेले आहेत.

सबब, श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कर्जुने खारे ता.जि. अहिल्यानगर यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार चौकशी करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

त्याअर्थी मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर, उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या शक्तींचा वापर करुन श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कर्जुने खारे ता.जि. अहिल्यानगर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्यावतीने श्री संजय अर्जुन वाघ, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती अहिल्यानगर यांची नियुक्ती करीत आहे .

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्रीम पुष्पावती सिताराम डेरे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व कामकाज नियमाप्रमाणे करावे व होणा-या प्रत्येक सुनावणीस नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

विभागीय चौकशी प्रकरणीचे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल. या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून याचा संकेतांक २०२६१११७०६०२२३ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 17-11-2026 12:47:00
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. सहाय्यक आयुक्त, (चौकशी),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक.

२/- सोबत श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कर्जुने खारे ता.जि. अहिल्यानगर यांची गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचिका या समवेत जोडली आहे. तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

२. श्री संजय अर्जुन वाघ, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती अहिल्यानगर
व्दारा व प्रत: -गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर.

२/- सादरकर्ता अधिकारी म्हणुन आपली नियुक्ती करण्यात आलेली असुन संदर्भ क्र.८ च्या परिपत्रकाचे सुक्ष्म अवलोकन करुन पुढील नियमोचित कार्यवाही करावी.

३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर.

२/- सोबतचा आदेश श्रीम पुष्पावती सिताराम डेरे,ग्रामपंचायत अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

४. निवड नस्ती.

(स्वाक्षरीत/-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर